महाराष्ट्र शासन

ई मेल :- nitin.surve@nic.in .
दूरध्वनी क्र. ०२२-२२०२५३०९

क्रमांक:-सीओएम -२०१६/प्र.क्र.३१/संगणक कक्ष
वित्त विभाग,मंत्रालय, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- ३१ ऑगस्ट,२०१६

प्रति,

१. प्रधान सचिव ( व्यय ), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती.

२. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग,
३. प्रधान सचिव ( माहिती तंत्रज्ञान ), सा.प्र.वि,
४. प्रधान सचिव ( वित्तीय सुधारणा ), वित्त विभाग,
५. प्रधान सचिव ( लेखा व कोषागारे ), वित्त विभाग,
६. संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय,
७. सह सचिव ( प्रशासन ), वित्त विभाग
८. राष्ट्रीय सूचना विज्ञान केंद्राचे प्रतिनिधी,
९. उप सचिव, उद्योग विभाग,

} तथा सदस्य, प्रकल्प अंमलबजावणी समिती, वित्त विभाग

विषय - दिनांक १९.०७.२०१६ रोजी आयोजिलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) १७ व्या बैठकीचे इतिवृत्त...

महोदय / महोदया,

दिनांक १९.०७.२०१६ रोजी आयोजिलेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) १७ व्या बैठकीचे इतिवृत्त माहिती / आवश्यक कार्यवाहीस्तव सोबत जोडले आहे.

(वर्षा डोंगरे)
उप सचिव तथा
समिती-सचिव

सहपत्र : वरीलप्रमाणे

D:\Computer Section\minutes issue letter\cr 31-16.docx

विषय :- प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) दिनांक १९.०७.२०१६ रोजी आयोजित १७ व्या बैठकीचे इतिवृत्त.

प्रधान सचिव ( व्यय ) तथा समिती अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, यांच्या दालनात दिनांक १९.०७.२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता प्रस्तुत समितीची बैठक आयोजिण्यात आली. सदर बैठकीस समितीचे पुढील सदस्य आणि अन्य संबंधित पदाधिकारी हजर होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री.व्ही.गिरिराज | प्रधान सचिव ( व्यय ), वित्त विभाग तथा अध्यक्ष, प्रकल्प अंमलबजावणी समिती, |
| २. | श्री.वि.द.आठवले | सहसचिव ( प्रशासन ), वित्त विभाग,मंत्रालय, मुंबई, |
| ३. | श्री.स.अ.मु.नकवी | संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई, |
| ४. | श्री.जे.आर.इंगळे | सह संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई, |
| ५. | श्रीमती चारुशीला तांबेकर | सहसचिव , नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई, |
| ६. | श्री.बी.डी.गोंदाणे | वैज्ञानिक -C , NIC |
| ७. | श्रीमती वर्षा डोंगरे | उपसचिव ( संगणक ) तथा समिती-सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई. |

दिनांक १९.०७.२०१६ रोजी झालेल्या प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या १७ व्या बैठकीत तपशीलवार चर्चेनंतर खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत :-

<u>विषय क्रमांक - १</u> :- वित्त विभागात Ernst & Young LLP कंपनीच्या २ सल्लागारांना दिनांक १.८.२०१६ ते ३१.१.२०१७ या ६ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्याबाबत तसेच मुदतवाढीच्या कालावधीत दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयात नमूद दरानुसार मानधन अदा करण्याबाबत :-

वित्त विभागात ई-गव्हर्नन्स प्रकल्प राबविण्यास सहाय्य करण्यासाठी व सल्ला देण्यासाठी सामान्य प्रशासन विभागाच्या ५ जुलै, २०११ व दिनांक २१ सप्टेंबर, २०१२ च्या शासन निर्णयास अनुसरुन Ernst & Young LLP या कंपनीतील २ सल्लागारांची Senior Consultant आणि Consultant म्हणून कंत्राटी पध्दतीने १ वर्षाकरिता नियुक्ती करण्यात आली व दिनांक

२७.५.२०१३ च्या पत्रान्वये कंपनीस work order देण्यात आली. तद्नंतर वेळोवेळी प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या (PIC) मान्यतेने सदर सल्लागारांना मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर सल्लागारांची मागील मुदतवाढ दिनांक ३०.६.२०१६ रोजी समाप्त झालेली असल्यामुळे सदर सल्लागारांना आणखी मुदतवाढ देण्याकरिता प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समितीच्या दिनांक २०.६.२०१६ रोजी आयोजित केलेल्या बैठकीत मांडण्यात आला. प्रकल्प अंमलबजावणी समितीने E & Y कंपनीच्या २ सल्लागारांना पुढील ६ महिन्यांकरिता दिनांक १.७.२०१६ ते ३१.१२.२०१६ पर्यंत मुदतवाढ देण्यास मान्यता दिली आहे.

२. E & Y कंपनीच्या २ सल्लागारांना वरिष्ठ सल्लागार ( Senior Consultant ) व सल्लागार ( Consultant ) म्हणून दिनांक १ ऑगस्ट, २०१६ ते ३१ जानेवारी, २०१७ या ६ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्याबाबत तसेच सदर सल्लगारांना माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयात नमूद दरानुसार मानधन अदा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे.

या अनुषंगाने नमूद करण्यात येते की, माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये परिच्छेद क्र.४ मध्ये पुढील प्रमाणे नमूद केले आहे.

"For Finance and Accounts type of profile a candidate will only be hired as a team member in large eGovernance project, where there is a need of financial experts. This GR is not applicable for departments where financial consultants are required for non eGoernance project."

वरील शासन निर्णयात उपरोक्त प्रमाणे नमूद केले असले तरी सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या Annexure २ मध्ये "The details regarding Type of work are given below" या मथळयाखाली अनुक्रमांक ७ येथे "Finance and Account" खाली वित्तीय सल्लागारांनी करावयाच्या कामाची माहिती दिली आहे. वित्त विभागात नियुक्त E & Y कंपनीचे २ सल्लागार अशाच स्वरुपाचे काम करीत असल्यामुळे सदर सल्लागारांना दिनांक १.८.२०१६ ते ३१.१.२०१७ या कालावधीकरिता माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयामध्ये नमूद दरानुसार मानधन अदा करण्याबाबत प्रस्तावित करण्यात येत आहे. सदर सल्लागारांनी मुदतवाढीच्या कालावधीत करावयाची कामे/जबादाऱ्या/कामाची व्याप्ती (Scope of Work) १५ दिवसांत देण्यात येतील.

<u>समितीचे निर्देश</u> :- वित्त विभागात Ernst & Young LLP कंपनीच्या कार्यरत २ सल्लागारांना ( १

वरिष्ठ सल्लागार व १ कनिष्ठ सल्लागार यांना माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयात नमूद दरानुसार मानधनासह ) दिनांक १८.८.२०१६ ते १७.२.२०१७ या ६ महिन्यांकरिता मुदतवाढ देण्यास समितीने मान्यता दिली. मानधनाची रक्कम Ernst & Young LLP या कंपनीस अदा करण्यात यावी.

<u>विषय क्रमांक § २</u> :- Land Monetisation या विषयाच्या कामाकरिता Ernst & Young LLP कंपनीच्या श्री.रवी पटेल यांची १ ½ महिन्याकरिता दिनांक १ जुलै, २०१६ ते १५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत वरिष्ठ सल्लागार म्हणून कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबत :-

महाराष्ट्र राज्याच्या विकासाकरिता अधिक निधी आवश्यक असून केवळ कर रुपातून उपलब्ध होणारा निधी त्याकरिता पुरेसा नसल्याने इतर विकसनशिल देशांप्रमाणे वापराविना असलेल्या मालमत्तेचे पैशात रुपांतर ( Monetisation of unutilised assets ) करुन त्याद्वारे निधी उभारणे शक्य आहे. याकरिता अपर मुख्य सचिव ( वित्त ) यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन विविध विभागातील अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव यांची एक समिती गठीत करण्यास मा. मुख्यमंत्री महोदयांनी मान्यता दिली आहे. त्यानुसार वित्त विभागात Land Monetisation या विषयाच्या कामाकरिता Ernst & Young LLP कंपनीच्या श्री.रवी पटेल यांची १½ महिन्याकरिता दिनांक १ जुलै, २०१६ ते १५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत वरिष्ठ सल्लागार ( Senior Consultant ) म्हणून कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव प्रकल्प अंमलबजावणी समितीसमोर मांडण्यात येत आहे.

<u>समितीचे निर्देश</u> :- Land Monetisation या विषयाच्या कामाकरिता Ernst & Young LLP कंपनीच्या श्री.रवी पटेल यांची १ ½ महिन्याकरिता म्हणजेच दिनांक १ जुलै, २०१६ ते १५ ऑगस्ट, २०१६ पर्यंत वरिष्ठ सल्लागार म्हणून कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करण्यास व त्यांना माहिती तंत्रज्ञान संचालनालयाच्या दिनांक १.७.२०१४ च्या शासन निर्णयात नमूद दरानुसार मानधन अदा करण्यास मान्यता देण्यात आली. मानधनाची रक्कम Ernst & Young LLP या कंपनीस अदा करण्यात यावी.

.......................................